MHPU180008292014

नियमित दिवाणी दावा क्र. १२७/२०१४
हनुमंत
विरुध्द
भिवा व इतर

निशाणी क्रमांक १३८ वरील आदेश
(पारीत दिनांक २५/०९/२०२४)

सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ यांचे नजर चुकीने राहिलेले उर्वरित एक वारस अभिलेखावर घेण्याकामी झालेल्या विलंब माफीकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. ३ कामाबाई शिंगटे या दि. ०५/१२/२०२२ रोजी मयत झाल्या असून दि. १०/०४/२०२३ रोजी त्यांचे वारस अभिलेखावर घेण्याकामी अर्ज दिला होता. सदर अर्जावर त्यांच्या वारसांना नोटीस पाठवण्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांचे उर्वरित एक वारस वादी यांना माहिती नसल्याने नजर चुकीने अभिलेखावर घेण्याचे राहून गेले आहे. म्हणून न्याय हिताच्या दृष्टीने सदरचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. ३ यांचे उर्वरीत एक वारस नमूद करुन दाखल केलेला असून त्यास झालेला विलंब माफ करण्याची विनंती केली आहे.

३. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांनी म्हणणे दाखल केले असून त्यांच्या म्हणण्यानुसार सदरच्या अर्जामधील कारणे बरोबर व संयुक्तीक नाहीत. प्रतिवादी क्र. ३ हे सुमारे दोन वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली, परंतु अर्ज मंजूर केल्यास रुपये १५००/- अर्ज खर्च वादी यांच्यावर लादण्याची मागणी केली आहे.

४. अर्ज, त्यावरील उत्तर व अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. ३ या दि. ०५/१२/२०२२ रोजी मयत झाल्या असून त्यांचे वारस अभिलेखावर घेणे कामी दि. १०/०४/२०२३ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. परंतु त्यावेळी वादी यांच्याकडून एक उर्वरित प्रतिवादी क्र. ३ यांच्या वारसाबाबत नमूद करावयाचे राहून गेल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा अर्ज दि. २२/०६/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. सदरचे प्रकरण हे स्थावर मालमत्तेबाबत असल्याने प्रतिवादी क्र.३ यांचे एक उर्वरित वारस या दाव्यात नैसर्गिक न्यायतत्वाच्या नियमानुसार सामिल करणे गरजेचे आहे. त्याच

बरोबर प्रस्तुत कामी वादी यांनी केलेला विलंब दुर्लक्षून चालणार नाही. करिता वादी यांच्या प्रस्तुत अर्जावर अर्ज खर्च लादून सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य होईल. सदर अर्जास प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांनी म्हणणे दाखल केल्या प्रमाणे काही रक्कम खर्च म्हणून देणे गरजेचे आहे. म्हणुन मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१. सदरचा अर्ज रुपये ७००/- (रुपये सातशे फक्त) खर्च म्हणून वादी यांच्यावर लादून मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांना देण्यात यावी.

Digitally signed by KALDATE SHARAD BALBHIM
Date: 2024.09.26 13:35:43 +0530

दिनांक- २५/०९/२०२४.

(शरद ब. काळदाते )
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क. स्तर, दौंड,जि. पुणे.

## **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | Deepak A. Merukar, Grade-3 |
| Court / Panel | :- | (Sharad B. Kaldate)<br>2nd Jt. C.J.J.D. & Judicial Magistrate First Class (Court No. 2) Daund. |
| Order / Judgment date | :- | 25/09/2024. |
| Order / Judgment singed by the Presiding Officer on | :- | 25/09/2024. |
| Order/ Judgment uploaded on | :- | 26/09/2024. |